ओडियन




मराठी आणि हिंदुस्थानी सप्लिमेंट

ऑगस्ट १९३७

सौ. हिराबाई जव्हेरी

(माजगांवकर)

आणि पार्टीचा



'संघसंगीताचा'

उत्कृष्ट रेकॉर्ड

SB. 2180

(श्री. प्र. ग. गुप्तेकृत)

एक बाजूः—

तोः—चल ग राणी सूर्य ठेपला ।
कडेकपारावरी । हांकारु मेंढरास या घरीं ।
मी राजा रानाचा । या ग पर्जेचा ।
कारभार चालवि तो हरी ॥ धृ० ॥
तीः—ह्यो कोन कोठला सूर्य बया । लाइतो उठाया झोपाया ।
करि दिसभरी भटकगिरी । तरी आम्ही बरी ।
फुटं तांबडं चौघडा झडं । उठू बापुडं ।
काम दीसभरी रगडभरी । दीस झांकतां झ्वाप बरी ॥१॥

दुसरी बाजूः—

सर्वजणः—जाऊंया पाहूंया । गगनीं उडूनी या या ।
आला । आला आजला आपुला । हा भाग्यकाल ।
धुंडू अनील विमानांतुनी प्रीतीच्या ॥ धृ० ॥
तीः—पवनि मारिती विहग भरारा । नभीं चमकती इंदू तारा ।
तोः—दाविती आपुला प्रेम पसारा ।
बोधाया प्रेमि जगाया । अमोल प्रणया वितरुनी माया
सर्वजणः—प्रीतीच्या सुमनांच्या । माला त्या गुंफाया ।
हे–हृदय सुमन गुंफुकरांतुन । जाऊं विसरुन जगता या ॥१॥

ऑगस्ट १९३७

ओडियन रेकॉर्डस्



शशिकला केरेकट्टी SB 2236 } रमवी मना हा कान्हा—भिमपलास
२२३६ } ध्यास हा मम मना—बागेश्री

नामांकित कलावंतांबरोबर नवीन होतकरू गायक-गायिकांमधून निवड करून कलावंतांना रेकॉर्डवर आणणें हें ओडियनचें ध्येय आहे. **शशिकला केरेकट्टी** या कारवारी ज्ञातींतील एक सुविद्य तरुण विदुषी असून, त्यांचा आवाज अत्यंत मधुर व चित्ताकर्षक आहे. आमची ही उदयोन्मुख गायिका लवकर 'ओडीयन' स्टार्सच्या मालिकेंत वरचा नंबर मारील असेंच आपण मत द्याल.

कुमार संजीव कृत

एक बाजू—

रमवी मना हा कान्हा ।
प्रेमल श्यामलराणा ।
सुख शोभना कर कर लोभना ॥ धृ० ॥
कुंजनवनीं करी मंजुळ गुंजन ।
मनरंजन किं निखिल निरंजन ॥
भयद भव शमत हा ॥ १ ॥

दुसरी बाजू:—

ध्यास हा मम मना लागला ।
निशिदिनीं झुरत मनीं चंचला ॥ धृ० ॥
प्राण विसावा येईल केव्हां ।
जीव लतेला फुलवायाला ॥ १ ॥

श्री. फुलाजीबुवा व पार्टी SB. 2237 { पंढरीशी जा जा कुणी   भजन
२२३७ { घेई घेई राधा   ,,



सुप्रसिद्ध भजनकार **श्रीयुत फुलाजीबुवा** हे आपलीं भजनें अत्यंत तल्लीनतेनें व सणसणीत आवाजानें म्हणत असल्यामुळें त्यांचा भजनाचा प्रत्येक रेकॉर्ड अत्यंत लोकप्रिय होत असतो. या वेळचाही रेकॉर्ड त्यांच्या पूर्वकिर्तीत भर टाकील असाच आहे.

एक बाजूः—

पंढरीसी जा जा कुणी माझी विनवणी
हरीच्या कानीं जावुनी कुणी सांगा । देव निजला
असेल तरी करावा जागा ॥ धृ० ॥
देह गांव नगरी उत्तम
पहिला मुक्काम तेथें तुकाराम
माझा राम राम जावुनी कुणी सांगा ॥ १ ॥
उभी होती नयनांच्या तिरी
पतक शीरावरी चुकु नका वारी विठ्ठलाची
तुम्ही चुकवा मरणाचा झोला ॥ २ ॥
उभी होती रंभा पेठेंत मोठ्या थाटांत
आली वऱ्हाडांत चंद्रभागा
नामदेव चरणी झाला जागा ॥ ३ ॥
मुखीं स्मरावा गोविंद, आनंद कंद म्हणे आनंद
गोपाळकाला चला जाऊं, वेणु नादाला ॥ ४ ॥

दुसरी बाजूः—

नाना परी समजाविते, तरी न राहे श्रीहरी,
दहीभात कालवुनी, दिला वेगीं झडकरी
कडेवरी फिरले मी द्वारोद्वारी ।
राधे, राधे, राधे राधे, घेई श्यामसुंदरा ।
नेई आतां झडकरी आपुलीया मदीरा ॥ धृ० ॥
क्षणभरी घरीं असतां, करी खोडी सारंगपाणी
खेळावया बाहेरी जाता, आळ घेती गवळणी
थापटोनी नीजवीता पळोनी जातो राजद्वारीं ॥
राधा घेऊन हरीला त्वरें जात मंदिरी
ह्रदयी मंचकी पहुडविला श्रीहरी
एका जनार्दनी हरीला भोगी राधा सुंदरा राधे ॥ १ ॥

‘बाईसाठीं बुवा’



लेखकः—प्रो. **ना. सी. फडके**, एम्. ए.



तीन रेकॉर्डस्‌वरील संगीत नाटिका

SB. 2244 ते 2246

महाराष्ट्राचे अत्यंत आवडते लेखक प्रो. ना. सी. फडके, एम्. ए., यांच्या लेखणींतून हें नाटक उतरलें आहे येवढें सांगितल्यावर त्याच्या सौंदर्याची निराळी शिफारस करावयास नको.

बुवाबाजीसारख्या हिंदु समाजांत प्रचलित असलेल्या विषयावर नाटकाची उभारणी केली आहे. त्यामुळें सर्वांनाच हें नाटक आवडेल यांत शंका नाहीं.

या नाटकांत प्रो. **फडके** यानीं **“बाबुराव”**ची भूमिका केली आहे हें नाटकाचें एक वैशिष्ट्य आहे. या नाटकांतील इतर भूमिका सौ. **हिराबाई बडोदेकर, कमलाबाई बडोदेकर,** श्री. **लोंढे** अशा नामांकित कलावंतांनीं केल्या असल्यामुळें नाटक अत्यंत श्रवणीय झालें आहे.

हिंदी रेकॉर्डस्

श्रीमतीबाई नार्वेकर SB. 2239 } बल बल जावुं–पुर्याधनाश्री
२२३९ } मानना करोरी–गौडमल्हार



ओडियनच्या लोकप्रिय गायिका व रेडीयोस्टार

श्रीमतीबाई नार्वेकर यांचा हा रेकॉर्ड फार दिवसानंतर प्रसिद्ध होत आहे. या वेळेला बाईनीं "पुरीयाधनाश्री" व "गौडमल्हार" या दोन अवघड रागांतील चीजा गायिल्या आहेत. तरी वेळ न लावतां हा रेकॉर्ड आजच खरेदी करा व शास्त्रोक्त गायनाची मौज लुटा.

एक बाजू:—

बल बल ज्यावुं ज्यावुं बलरी ।
तोरे गांवके रोंग बुरी ॥ धृ० ॥
लेच लवा दूं देस सदा ।
रोंग मानत नाही बुरी ॥ १ ॥

दुसरी बाजू:—

मानना करोरी बोरी तोरे ।
कारन आयो मेहा ॥ धृ० ॥
हरी हरी भूम पर बर सोहो ।
चोब नई रे नार नयो नेहा ॥ १ ॥

मिस् सुलोचना पालकर SB. 2241 / २२४१ { बोल राजा बाल मुवा—भैरवी / मै करता जोरत— बागेश्री



मिस् सुलोचना पालकर यानीं रेकॉर्डसूच्या जगांत आपलें नांव रंगभूमीप्रमाणेंच गाजवून सोडलें आहे. त्यांच्या या वेळच्या हिंदी गाण्याचा रेकॉर्डही आपल्याला अत्यंत आवडेल.

एक बाजू:—

बोल राजा बाल मुवा मोसे ॥ धृ० ॥
तोरे नैना लागी अंगिया सुजे ।
गया गया पहिला जमानीयां ।
गोरे गोरे गालोंपे बुलायला ।
ऐसे कैसी कन्हयां तो खेले होरी ॥ १ ॥

दुसरी बाजू:—

मै कर जोरत थाडी हुं तोरे पास ॥ धृ ० ॥
पिया मोरी इतनी बिनती जरा मानत
या नगरीमें चोर भलेरे
थाडे लागा रहे ॥ १ ॥

मिसेस् सरस्वतीबाई SB 2240 / २२४० } कन्ह्या रे नाही मोरे—तिलक कामोद / धरिये गिनत जा—पुर्या

बाई सरस्वतीबाई या खांसाहेब अबदुल करीमखां यांच्या पट्टशिष्या असून, गेलीं किस्येक वर्षें त्या खांसाहेबांच्याजवळ गायनाचें अध्ययन करीत आहेत. कांहीं वर्षांपूर्वी खांसाहेबांच्या जलशांत त्यांच्या गायनाची फार तारीफ झालेली आहे. अशा गुणी गायिकेचें दुर्मिळ गायन ऐकण्याची सुसंधि 'ओडियन'नें या रेकॉर्डद्वारें आणून दिली आहे. तरी आपण तिचा अवश्य फायदा घ्यावा.

एक बाजूः—

कन्हैयारे नाहीं मोरे बसका ॥ धृ० ॥
बिंद्रारे बनकी कुंजगलनमे
पनकाहे अटका नाहीं मोरे बसका ॥ १ ॥

दुसरी बाजूः—

धरिये गिनत जात पिया मिलनकी आस ॥ धृ० ॥
घरि पल छिन दिन रैन हटेली ।
जों लों घरमें सास ॥ १ ॥

सौ. दुर्गाबाई खोटे

SB. 2205 / नं. २२०५
- निराले इस विणाके — 'प्रतीभा'
- किस्के आनेकी — ,,

SB. 2206 / नं. २२०६
- विधी तनये शारदे
- हंसऱ्या गोजीऱ्या

'स्वर देवता' बाई सुंदराबाई

SA. 3078 / नं. ३०७८
- येग येग गाई-- — शिशु गीत
- तुजविना गोपगोपिंना— — भावगीत

कु. इंदुमती गुप्ते, जी. ए.

SB. 2229 / नं. २२२९
- मन रंगले हें विमला— — दुर्गा
- उदित चंद्र मनिंचा— — पहाडी

SB. 2227 / नं. २२२७
- चलाओ तीरे नजर— — राजमुकुट
- मैं कबतक करूं — —असीरे हवीस

श्री. राजा पंडित

SB. 2230 / नं. २२३०
- शास्त्रीबुवाची— — नक्कल
- भोजनभीमदेव— — ,,

स्कूल ऑफ इंडियन म्युझिक

(कु. कांचनमाला व कु. कृष्णाबाई)

SB. 2232 / नं. २२३२
- शामसुंदर मदनमोहन
- हरी करत दासपर प्रीती

सुमतीबाई वाडकर

SB. 2231 / नं. २२३१
- दिल चुराये हुवे— — गझल
- भयो सैंया बिना— — ,,

श्री. गोविंदराव टेंबे

SB. 2235 / नं. २२३५
- हार्मोनियम सोलो— — ठुंबरी
- ,, ,, — — तिलककामोद

श्री. मो. ग. रांगणेकरकृत

‘एक चटकदार शब्दचित्र’

ौ. १९००—कशी होती ?

व

सौ. १९३७—कशी आहे ?

हे अत्यंत हृदयंगम रीतीनें



“ सिनेमा सम्राज्ञी ” **सौ. दुर्गाबाई खोटे**

‘ओडियन रेकॉर्डवर’ तुम्हाला लवकरच सांगतील.

And Don't Fail to hear them on an

ODEON

PORTABLE



Ask for Catalogue:—

Ruby Record Co. Fort, Bombay.

Shree Laxmi Narayan Press, Bombay 2.